संं. फौ. ख. क्र. १५७/२०२४
शासन वि. गजानन गौरखडे
CNR: MHWR090002439024
(न्यायनिर्णय नि. १२ च्या पुढे सुरु)

## न्यायनिर्णय

सदर प्रकरणातील अभियोगपक्षाचे कथन व पुरावा लक्षात घेता माझ्या समक्ष खाली मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले असून त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- |
| १. अभियोपक्ष हे सिध्द करतो काय कि, दि. ०४/१०/२०२३ रोजी १९.०० ते २०.०० वाजताचे दरम्यान मौजा काकडा, ता. कारंजा घा. जि. वर्धा येथे आरोपीच्या ताब्यातुन एका प्लास्टीक कॅनमध्ये २० लीटर गावठी मोहा दारू व एक गुलाबी रंगाची कापडी थैलीमध्ये ९० एम.एल. चे देशी दारू संत्रा ५००० कंपनीचे ४ शिश्या अवैधरित्या बाळगून आढळून आले व त्याप्रमाणे आरोपीने मुंबई दारूबंदी अधिनियम कलम-६५ ई, ७७ अ प्रमाणे गुन्हा केलेला आहे. | **...नाही...** |
| २. आदेश काय | **निर्दोष मुक्तता** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबतः-**

२. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने पंच- धनराज मारोतराव वानखेडे (अ.सा.१) व राहूल गोपाल गौरखेडे (अ.सा.२) यांना तपासले. त्यांच्या पुराव्यात अभियोग पक्षाला सहकार्य करण्यासाठी कोणताही मजकुर न आल्यामुळे नि.क्र.१ वरील आदेशानुसार अभियोपक्षाच्या पुराव्याची बाजु बंद करण्यात आली आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

३. धनराज मारोतराव वानखेडे (अ.सा.१) व राहूल गोपाल गौरखेडे (अ.सा.२) या दोन्ही पंच साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पोलिसांनी त्यांना

पंचनाम्यासाठी बोलवले नव्हते तसेच त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा तयार करण्यात आला नाही असे सांगितले आहे. अभियोग पक्षातर्फे विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांमध्ये सुध्दा त्यांनी सांगितले की पोलीसांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन एका प्लास्टीक कॅनमध्ये २० लीटर गावठी मोहा दारू व एक गुलाबी रंगाची कापडी थैलीमध्ये ९० एम.एल. चे देशी दारू संत्रा ५००० कंपनीचे ४ शिश्या जप्त केले नाही. त्यांच्या पुराव्यात अभियोग पक्षाला मदत होण्याच्या दृष्टीने काहीही महत्वपूर्ण आले नाही. त्यामुळे सदरील साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

४. उपरोक्त पुराव्यावरुन घटनास्थळावर नेमके काय घडले याबाबत स्वतंत्र पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. अभियोपक्षाने पंचनामा सिध्द केलेला नाही. सदर प्रकरणामध्ये आरोपीचा जप्त मुद्देमालावर जाणीवपूर्वक ताबा सिध्द होणे महत्वाचे आहे. परंतू स्वतंत्र पंच साक्षदारांनी सहकार्य न केल्यामुळे अभियोग पक्ष सदर बाब सिध्द करू शकले नाही. एकंदरीत आरोपीच्या ताब्यातुन एका प्लास्टीक कॅनमध्ये २० लीटर गावठी मोहा दारू व एक गुलाबी रंगाची कापडी थैलीमध्ये ९० एम.एल. चे देशी दारू संत्रा ५००० कंपनीचे ४ शिश्या अवैधरित्या जप्त करण्यात आले होते हे सिध्द होत नाही. सदर प्रकरणामध्ये सी.ए. अहवाल दाखल केला यावरून जप्त मुद्देमाल मादक द्रव्य असल्याचे सिध्द होते. परंतू तो मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त झाल्याचे स्वतंत्र पुराव्याअभावी सिध्द झाले नाही. सबब जप्त करण्यात आलेल्या मुद्येमाल हा घटनास्थळावरुन जप्त करण्यात आला ही बाब पुराव्या अभावी सिध्द होवू शकली नाही. सबब पुराव्या अभावी आरोपीचा गुन्हा सिध्द होत नसल्याने मी मुद्या क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी दर्शविते व त्याप्रमाणे निष्कर्ष देते.

**सं. फौ. ख. क्र. १५७/२०२४**
**शासन वि. गजानन गौरखडे**
**CNR: MHWR090002439024**
**(न्यायनिर्णय नि. १२ च्या पुढे सुरु)**

**<u>मुद्या क्रमांक २ बाबत</u>**

५. अभियोपक्षाने आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सबब विश्वसनीय व संयुक्तीक पुरावा सदरच्या खटल्यामध्ये आणलेला नाही त्यामुळे आरोपी विरुध्दच्या गुन्हा सिध्द होत नसल्याने तो निर्दोषमुक्ततेस पात्र ठरतो.

६. जप्त मुद्येमाल पोलीस स्टेशनला जमा असल्याने त्याबाबतचा नाश करण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल. सबब मुद्या क्रमांक २ चे अनुषंगाने पुढील अंतिम आदेश पारीत करण्यात येते.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी गजानन रामाजी गौरखेडे यांना फौजदारी प्रकिया संहितेच्या कलम २५५ (१) अन्वये महाराष्ट्र दारु प्रतिबंधक अधिनियम, १९४९ चे कलम-६५ (ई), ७७ अ या गुन्हयामधून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक जमानतीचे व जामिनदाराचे बंधपत्र रद्य करण्यात येते.

३. पोलीस स्टेशन येथे मालमत्ता क्र.२४६/२०२३ मध्ये जप्त असलेला मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क वर्धा यांच्याकडे नियमाप्रमाणे विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावी.

४. पोलीस स्टेशन येथे मालमत्ता क्र.२८१/२०२३ मध्ये जप्त असलेली दुचाकी क्र.एम.एच.३२. ए.पी.५४२० ही मालकीचे दस्त पडताळणी करून मुळ मालकास परत करावी किंवा तीन महिन्याच्या आत मागणी न केल्यास त्याचे नियमाप्रमाणे लिलाव करून येणारी रक्कम सरकार जमा करावी.

५. आरोपीने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे स्वतःचे रु. १५०००/- चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करुन पुर्तता करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषित करण्यात आला.)**

DIKSHA DINESH VIGHNE
Digitally signed by DIKSHA DINESH VIGHNE
Date: 2026.03.25 10:49:58 +0530

(दिक्षा दि. विघ्ने)

वर्धा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

दिनांक : २४-०३-२०२६ कारंजा घा.